नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ५३ Issue - 53 | वार गुरुवार दि. १० जुलै २०२५ Blow- Thursday Date 10 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## शिक्षकांच्या आंदोलनाला यश! २० टक्के वाढीव पगार लवकरच खात्यात जमा, सरकारचा मोठा निर्णय



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आझाद मैदानावरील शिक्षकांच्या आंदोलनाला यश मिळालं असून विधिमंडळाचं अधिवेशन संपल्यानंतर विनाअनुदानित शिक्षकांच्या खात्यात २० टक्के वाढीव पगार जमा होईल, असं आश्वासन सरकारनं दिलं आहे. आझाद मैदानात शिक्षकांच्या आंदोलनात जाऊन मंत्री गिरीश महाजन यांनी ही घोषणा केली. इथून पुढे पगाराची तारीख टळणार नाही, असं आश्वासनही त्यांनी दिलं. त्याआधी शिक्षकांच्या शिष्टमंडळानं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली. चर्चा सकारात्मक झाल्याचं महाजन यांनी सांगितलं. सकाळी शरद पवार आणि उद्धव ठाकरेंनी आझाद मैदानात जाऊन शिक्षकांची भेट घेतली होती.

राज्यातील विनाअनुदानित शिक्षकांना देण्यात आलेल्या आश्वासन सरकारने पूर्ण करावे, शाळांना २० टक्के टप्प्याटप्याने अनुदान यासह इतर मागण्यांसाठी शिक्षकांनी आझाद मैदाना-वर आंदोलन सुरू केलं आहे. आपल्या मागणीसाठी शिक्षक आक्रमक होताच सरकारने त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचं आश्वासन दिलं.

अधिवेशन संपताच शिक्षकांच्या खात्यावर पैसे

गिरीश महाजन म्हणाले की, १८ तारखेला पावसाळी अधिवेशन संपेल. त्यावेळी तुमच्या खात्यात २० टक्के वाढीव पगार जमा झालेला असेल. मुख्यमंत्री हे शिक्षकांच्या मागण्यांबाबत सकारात्मक आ-हेत.

गिरीश महाजन म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी शिक्षकांसबंधी काही महत्त्वा-चे निर्णय घेतले आहेत. मात्र थोड्या आर्थिक अडचणींमुळे मधल्या काही काळातील हफ्ते देण्यास उशीर झाला.

मी तुम्हाला सांगतो की तुम्ही कुणावरही विश्वास ठेऊ नका, तुमचे काम आम्हीच करणार आहोत. पुरवणी मागण्यांमधे आज मांडता आले नाही, मात्र इथून पुढे पगाराची तारीख टळणार नाही. इथून पुढे हा पगार नियमितपणे तुमच्या खात्यात जमा होईल.

राज्यातील सुमारे ५,००० खासगी विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्याने अनुदान देण्याचा निर्णय ऑक्टोबर २०२४ मधील अधिवेशनात घेण्यात आला होता. मात्र त्यानंतर १० महिने उलटूनही अद्याप निधीची कोणतीही तरतूद सरकारने केली नाही. या पार्श्वभूमीवर ८ व ९ जुलै रोजी राज्यातील शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचसोबत शिक्षकांनी आपल्या मागण्यांसाठी आझाद मैदानावर आंदोलन सुरू केलं.

राज्यामध्ये सध्या ५,८४४ अंशतः अनुदानित खासगी शाळा आहेत. यामध्ये ८२० प्राथमिक, १,९८४ माध्यमिक व ३,०४० उच्च माध्यमिक शाळा आहेत. या शाळांमध्ये एकूण ३,५१३ प्राथमिक, २,३८० माध्यमिक व ३,०४३ उच्च माध्यमिक तुकड्या कार्यरत आहेत. एकूण ८,६०२ प्राथमिक शिक्षक, २४,०२८ माध्यमिक शिक्षक आणि १६,९३२ उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या शाळांमध्ये कार्यरत आहेत.

शाळांना २० टक्के टप्प्याटप्याने अनुदान देण्याचा निर्णय झाला असला तरी प्रत्यक्षात अद्याप एकाही शाळेला निधी मिळालेला नाही. तसेच अधिवेशनात यासाठी पुरवणी मागणीही मांडलेली नाही.

या प्रकरणी शिक्षक आक्रमक झाल्यानंतर सरकारने त्यांना सकारात्मक प्रतिसाद देत त्यांच्या मागण्या मान्य करण्याचं आश्वासन दिलं.

# गुजरात पूल दुर्घटनेतील मृतांचा आकडा वाढला; १३ जण दगावले

## आंदोलक कार्यकर्त्यांची भावना; शांततेत निघाला मराठी स्वाभिमान मोर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गांधीनगर : गुजरातच्या वडोदरा जिल्ह्यात गंभीरा पूल कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली आहे. ज्यामध्ये पुल-ावरुन जाणाऱ्या एका ट्रकसह तीन वाहनं थेट नदीत कोसळली आहेत. या दुर्घटनेतील मृतांचा आकडा आता १३ वर पो-होचला आहे. तर अनेकजण जखमी झाले आहेत. बचावकार्य अजूनही सुरू असून जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे आणि मृतांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदतही जाहीर केली आहे.

बुधवारी सकाळी ०७.३० च्या सुमारास ही दुर्घटना घडली आहे. गंभीरा पुलाचा काही भाग अचानक कोसळला आणि त्यावरून जाणारा एक ट्रक, व्हॅन आणि कार महासागर नदीत कोसळले. स्थानिक लोकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्याला सुरुवात केली आणि अग्निशमन दल तसेच पोलिसांना याबाबत माहिती दिली. पोलिसांनी आणि आपत्कालीन पथकांनी घटनास्थळी पोहोचत बचावकार्य सुरू केले.



एका अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्याने पीटीआयला सांगितले की, 'पुलाचा काही भाग अचानक कोसळला. त्या भागातून जाणारी तीन वाह-ने नदीत कोसळली. आम्ही बचावकार्य सुरू केले आहे आणि आतापर्यंत १० जणांना बाहेर काढण्यात आले आहे.

गुजरातमधील वडोदरा शहरापासून सुमारे २५ किलोमीटर अंतरावर असलेला हा पूल सौराष्ट्रकडे जाणाऱ्या वाहतुकीसाठी महत्त्वाचा मार्ग मानला जातो. परंतु पूल कोसळल्याने प्रशासनाच्या कारभारावर अनेक प्रश्न उपस्थित होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या परदेश दौऱ्यावर आहेत. त्यांनी गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांना फोन करून परिस्थितीचा आढावा घेतला. या दुर्घटनेत ज्यांनी प्राण गमावले त्यांच्या कुटुंबीयांप्रती त्यांनी शोक व्यक्त केला आहे आणि जखमी लवकरात लवकर बरे व्हावे, अशी प्रार्थना केली आहे.

मृतांच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी (झचछठऋ) मधून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना ५०,००० रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान, गुजरात काँग्रेसने या घटनेसाठी राज्य सरकारला जबाबदार धरले आहे आणि त्यांच्यावर टीकेची झोड उठवली.

## सावधगिरी / खबरदारीची सूचना

तमाम लोकांना या सावधगिरी/ खबरदारीची सूचनाद्वारे कळविण्यात येते की,

अक्कलकोट राजघराण्याचे सदस्य, संस्थान स्थापनेपासून खालीलप्रमाणे असून इतर कोणतीही व्यक्ती अक्कलकोट राजघराण्याची सदस्य अथवा वारस नाही.

- श्रीमंत फत्तेसिंहराजे भोसले पहिले
- श्रीमंत महाराज शहाजीराजे पहिले
- श्रीमंत महाराज फत्तेसिंहराजे द्वितीय भोसले
- श्रीमंत महाराज मालोजीराजे प्रथम भोसले
- श्रीमंत महाराज शहाजीराजे दुसरे भोसले
- श्रीमंत महाराज मालोजीराजे दुसरे भोसले
- श्रीमंत महाराज शहाजीराजे तिसरे भोसले
- श्रीमंत महाराज फत्तेसिंहराजे तिसरे भोसले
- श्रीमंत महाराज विजयसिंहराजे फत्तेसिंहराजे भोसले
- श्रीमंत महाराज जयसिंहराजे फत्तेसिंहराजे भोसले
- श्रीमंत राजकुमारी संयुक्ताराजे जयसिंहराजे भोसले
- श्रीमंत राजकुमारी सुनिताराजे जयसिंहराजे भोसले
- श्रीमंत मालोजीराजे तिसरे संयुक्ताराजे भोसले **(सध्याचे राजासाहेब, अक्कलकोट)**

वरील नमूद व्यक्तींव्यतिरिक्त अक्कलकोट राजघराण्याशी इतर कोणत्याही व्यक्ती/ इसम यांचा कुठल्याही प्रकारचा कसलाही संबंध नाही.


सबब, तमाम लोकांना या सूचनेद्वारे कळविण्यात येते की, अगर एखादी व्यक्ती/ इसम त्याचा अक्कलकोट राजघराण्याशी संबंध अथवा वारस असल्याचे सांगत/ भासवत असेल तर त्याच्यावर विश्वास ठेवू नये. तसेच त्यांनी केलेल्या अक्कलकोट राजघराण्याविषयी कुठल्याही वक्तव्याचा अवलंब करू नये. लोकांना फसवण्यासाठी अक्कलकोट राजघराण्याचा सदस्य/ वारस असल्याची केलेली बतावणी वर विश्वास ठेऊ नये व तशी बतावणी केल्यास अथवा आढळून आल्यास संबंधित व्यक्तींवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

तसेच अगर कोणाला अक्कलकोट राजघराण्याची अधिक माहिती हवी असल्यास त्यांनी **http://royalfamilyakkalkot.com** या संकेतस्थळावर भेट द्यावी.

सबब, ही सावधगिरीची/ खबरदारीची सूचना

**अक्कलकोट**
दि. ०३/०६/२०२५

स्वाक्षरित/-
**ॲड. एस. जे. राजे भोसले, ॲड. प्रतिक अ. तावरे**
R/o. New Palace Premises, Akkalkot, Dist. Solapur
मोबा. ९४२३०३२३३२/९८५०९३७७७३
बंगला नं. ६२, कॅम्प, सदर बझार, सातारा ४१५००१
मो. ९४२३०३२३३२



दैनिक
# यश सिद्धि न्यूज
गुरुवार दि. १० जुलै २०२५ 

## संपादकीय....

## तुकडेबंदी कायदा रद्द

राज्यातील महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणारा कायदा १९४७ नुसार ठराविक प्रमाणात कमी क्षेत्रफळ असलेल्या जमिनींची खरेदी-विक्री कायद्याने प्रतिबंधित होती. या पार्श्वभूमीवर १ जानेवारी २०२५ पर्यंत शहरी भाग, गावठाण पासून २०० मीटर पर्यंत आणि विविध प्राधिकरणांमधील भागात झालेले सर्व तुकड्यांचे व्यवहार मान्य करण्यात येणार आहेत. अशाप्रकारे एक गुंठेपर्यंत जमिन व्यवहारासाठी तुकडेबंदी कायदा रद्द केला जाईल, अशी घोषणा नुकतीच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेची विधानसभेत केली. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी १५ दिवसात आदर्श कार्यप्रणाली तयार करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे सुमारे ५० लाख कुटुंबांना जमीन व्यवहाराचा फायदा होणार आहे. १ जानेवारी २०२५ नंतर अशा व्यवहारांमध्ये प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. राज्य शासनाने ८ ऑगस्ट २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार, मुंबई शहर, मुंबई उपनगर, अकोला आणि रायगड जिल्हे वगळता राज्यातील इतर ३२ जिल्ह्यांमध्ये स्थानिक क्षेत्र घोषित करून बागायतीसाठी १० आर आणि जिरायतीसाठी २० आर इतके प्रमाणभूत क्षेत्र निश्चित केले आहे. यामध्ये महानगरपालिका व नगरपरिषदा हद्दीतील क्षेत्रांचा समावेश करण्यात आलेला नाही. धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत १९४७ च्या कायद्यातील कलम ७, ८ व ८अ नुसार स्थानिक क्षेत्रामध्ये जमिनीचे तुकडे निर्माण होणार नाहीत, अशा पद्धतीनेच हस्तांतरण करता येते. मात्र, १ जानेवारी २०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार विशेष नियोजन प्राधिकरण किंवा नगरविकास प्राधिकरण अंतर्गत येणाऱ्या, तसेच प्रादेशिक योजनेत अकृषिक वापरासाठी निश्चित केलेल्या जमिनी या कायद्याच्या तुकडेबंदीच्या नियमांपासून वगळण्यात आलेल्या आहेत.

# नो यॉर राइट्स वर्कशॉप मध्ये सामील व्हा, तुमच्या मुलाचे भवितव्य सशक्त करा!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उम्मीद चाईल्ड डेव्हलपमेंट सेंटर पालक आणि प्रोफेशनल डिसबिलिटी फील्ड मध्ये काम करणाऱ्यांसाठी नो युअर राईट्स वर्कशॉप घेऊन येत आहे. या वर्कशॉपमध्ये विविध विषयांवर चर्चा होणार आहे. यामध्ये चिल्ड्रन्स विथ डिसबिलिटीच्या अधिकारांवर चर्चा होणार आहे. त्या सोबतच डिसबिलिटी सर्टीफिकेट कसे व कुठे बनवावे? त्याचा वापर कसा करावा? यासह बऱ्याच विषयांवर चर्चा करणार आहोत. या वर्कशॉपमधील महत्वाचा भाग म्हणजे एक पालक आपला अनुभव सांगणार आहेत. त्यांनी त्याच्या मुलासाठी कसा ह्या सर्व सरकारी योजनाचा लाभ घेतला आणि त्यांना काय फायदे मिळाले याबद्दल जाणून घेता येईल.

नो यॉर राइट्स वर्कशॉप येत्या १९ जुलै २०२५ रोजी सकाळी १० ते १ दरम्यान आहे. सदर वर्कशॉप ऑनलाईन असणार असून यात सामील होण्यासाठी ८५९१२९१६०३ या मोबाईल नंबरवर रेजिस्ट्रेशन करणे गरजेचे आहे.असे आवाहन करण्यात आले आहे.

**शाळाबाह्य विद्यार्थी सर्वेक्षण महत्व आणि प्रत्यक्ष उपयोग**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यामध्ये जगाला दिशा देणारे व जागतिक विचार करणारे नागरिक घडावेत अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. आपल्या राज्यातील शिक्षकांनी अध्यापनात नवोपक्रम आणून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास गती आणली आहे. शालेय गुणवत्ता वाढ ही मोठ्या प्रमाणात झालेली दिसते. शिक्षण हक्क कायद्यानुसार सहा ते १४ वयोगटातील बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण दिले जात आहे. परंतु तरीही काही बालके ही शिक्षणापासून वंचित राहताना दिसतात. ह्या समस्येवर उपाय म्हणूनच शालाबाह्य सर्वेक्षण हे गरजेचे आहे.

रोजगारासाठी पालकांचे होणारे स्थलांतर आणि त्यामुळे त्यांच्या मुलांचे मध्येच शिक्षण सुटणे ह्या समस्येवर उपाय म्हणून १६ जून २०२५ ला जरी शाळा सुरू झाली. तरीही १ जुलै ते १५ जुलै २०२५ हा कालावधी शाळाबाह्य सर्वेक्षणासाठी निर्धारित केला आहे. दाखल पात्र विद्यार्थी हे १६ जून ते ३० जून पर्यंत दाखल होतातच परंतु जी बालके स्थलांतर होऊन येतात, अशा बालकांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी हे सर्वेक्षण अत्यंत गरजेचेआहे.

**शाळाबाह्य विद्यार्थी म्हणजे कोण?**

शाळाबाह्य विद्यार्थी म्हणजे असे मुलगे किंवा मुली जे शिक्षण पद्धतीतून बाहेर पडले आहेत. म्हणजेच जे शाळेत नाव नोंदवले परंतु एक महिन्यापेक्षा जास्त दिवस ते शाळेत गेले नाहीत. तसेच ज्यांचे वय सहा ते चौदा वयोगटात असून कुठल्याही शाळेत गेले नाहीत,अशी मुले किंवा पूर्णपणे शिक्षण सोडून दिलेले विद्यार्थी. तसेच दिव्यांग विद्यार्थी या सर्वांचा शालाबाह्य विद्यार्थ्यांमध्ये समावेश होतो.

**✼ सर्वेक्षणाचे महत्व ✼**

भारतातील शिक्षण हक्क कायदा (RTE) सहा ते चौदा वयोगटातील प्रत्येक मुलाला मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे हे निश्चित करतो. शालाबाह्य विद्यार्थ्यांची माहिती मिळाल्याशिवाय या कायद्याची प्रभावीपणे

अंमलबजावणी आपण करू शकत नाही. त्यासाठी हे सर्वेक्षण आवश्यक आहे.

१)सरकारी योजनांचे योग्य नियोजन करणे.

सर्वेक्षणातून मिळालेल्या माहितीच्या आधारे सरकार विविध योजनांचा उदाहरणार्थ सर्व शिक्षा अभियान, शालेय पोषण आहार, बालविकास योजना, अनेक शिष्यवृत्ती यांचा योग्य विनियोग गरजू मुलांपर्यंत पोहोचवू शकते.

२) शालाबाह्य विद्यार्थ्यांचा शिक्षणात समावेश वाढवणे–

शालाबाह्य विद्यार्थ्यांची ओळख करून त्यांना परत शाळेत आणण्याची कार्यवाही या सर्वेक्षणामधून होते.

३)समस्येची कारणमीमांसा –

मुलं का शाळा सोडतात हे कळल्यावर त्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करता येतात. उदाहरणार्थ आर्थिक अडचण, मजुरी, स्थलांतर इत्यादी. समस्या सोडवण्यास मदत होते. सर्वेक्षणाचा प्रत्यक्ष शासनाला उपयोग

१) धोरण रचना – सरकार ह्या आकडेवारीवरून शिक्षणाबाबत योग्य धोरण तयार करू शकतं.

२) शिक्षक/ सामाजिक कार्यकर्त्यांना मार्गदर्शन– कोणत्या मुलांवर लक्ष द्यायचं हे ठरवता येतं. तसेच सामाजिक कार्यकर्त्यांना त्यांच्यासाठी योजना आखता येतात.

३) संस्थाना मदत – एनजीओ किंवा सीएसआर प्रकल्प यांना गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणं शासनाला सोपं जातं.

४)डेटा आधारित निर्णय– शिक्षण विभागाला या सर्वेक्षणाचे विश्लेषण करून परिणामकारक निर्णय घेता येतो.

५) मुलांचे जीवनमान सुधारणा–

या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षण प्रवाहात आणून त्यांचे भवितव्य उजळण्यासाठी निश्चितच शासनाला या सर्वेक्षणाचा उपयोग होतो.

थोडक्यात शाळाबाह्य सर्वेक्षण हे केवळ आकडे गोळा करण्याचे काम नाही तर ते शाळा सोडलेल्या किंवा कधीच शाळेत न गेलेल्या विद्यार्थ्यांचा शिक्षणात व समाजात समावेश, समान संधी आणि शिक्षणाचा अधिकार यासाठी एक महत्त्वाचे साधन आहे. त्याचा उपयोग केल्यास एकही मूल शिक्षणापासून वंचित राहणार नाही. तसेच शिक्षण हक्क कायद्याची योग्य अंमलबजावणी करता येईल.

**– लेखिका: सौ पुष्पावती तुकाराम भोईर**
**जिल्हा परिषद शाळा सोनाळे, तालुका भिवंडी जिल्हा ठाणे**

## पंढरीतील शिष्टमंडळाकडून ना. एकनाथ शिंदे यांचे आभार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनीधी

पंढरपूर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी एक अहिल्यादेवी सांस्कृतिक भवन असावे अशी मागणी धनगर समाजाच्या वतीने करण्यात आली होती. त्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या भावनासाठी जागा आणि निधी उपलब्ध करून दिला आहे. याबद्दल पंढरीतील एका शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन, आभार व्यक्त करीत सत्कार केला आहे.

या शिष्टमंडळमध्ये युवासेना राज्य कार्यकारणी सदस्य तथा सोलापूर माढा लोकसभा युवती अध्यक्ष इंजी.प्रियांकाताई परांडे ,धनगर समाजाच्या रणरागिणी तसेच भाजप किसान मोर्चा प्रदेश सदस्य विश्रांतीताई भूसनर यांनी मुंबई येथे उपमुख्यमंत्री सांस्कृतिक भवन साठी जागा व निधी दिल्याबद्दल यांच्या समवेत साहेबांचे आभार मानले तसेच पंढरपूर येथील इतर विकास कामांच्या विषयांवर चर्चा झाली. येत्या शुक्रवारी पुढील बैठीकीसाठी वेळही देण्यात आली असल्याची माहिती इंजि प्रियांका परांडे यांनी दिली आहे.

## क्षीरसागर यांची भाजप राज्य परिषद सदस्यपदी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



उमरगा/प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीच्या राज्य परिषद सदस्यपदी बाळासाहेब क्षीरसागर यांची निवड झाली.या निवडीमुळे त्यांचे परंडा विधानसभा मतदारसंघातून अभिनंदन केले जात आहे. ही निवड आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीसाठी प्रभावी ठरणार आहे.

गेल्या ३५ ते ४० वर्षापासून भारतीय जनता पार्टीचे एकनिष्ठ पदाधिकारी कार्यकर्ते म्हणून कार्यरत असलेले, विविध पक्ष संघटनात्मक जबाबदारी सांभाळून परंडा मतदार संघात पक्ष बळकट करणारे आणि सध्या परंडा विधानसभा अध्यक्ष म्हणून कार्यरत असलेले बाळासाहेब महादेव क्षीरसागर यांची पक्षश्रेष्ठींनी आज दि. ८ जूलै रोजी राज्य परिषद सदस्य पदी निवड जाहीर केली आहे.

काही दिवसावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत त्या दृष्टीने या निवडीमुळे स्थानिक स्वराज्य संस्था, नगर पालिका, जिल्हा परिषदपंचायत समिती, ग्रामपंचायतच्या सार्वत्रिक निवडणुकीत कार्यकर्त्यांना बळ मिळणार आहे लवकरच त्यांचा कार्यकर्त्यांच्यावतीने पक्ष कार्यालयात मोठा सत्कारही केला जाणार आहे.

भाजपच्या राज्य परिषद सदस्य पदी बाळासाहेब क्षीरसागर यांची निवड झाल्याबद्दल तालुका अध्यक्ष संतोष सुपेकर, जिल्हा उपाध्यक्ष सुदाम पाटील, तत्कालीन अध्यक्ष महादेव वडेकर, शहर अध्यक्ष बाबासाहेब वीर, आबासाहेब मस्कर, तालुका प्रसिद्धी प्रमुख शंकर खामकर, सिद्धार्थ जाधव, विधिज्ञ संजय शाळू, चंद्रकांत गवळी, बापू बगाडे, शुभम खामकर, मारुती चोबे, महबूब शेख, प्रदीप साठे, हेमंत देशमुख, बाबुराव खरात, बन्सी काळे, आकाश शेटे, सुब्राव शिंदे, बापू नागरगोजे आदिनी त्यांचेस्वागत केले.

# दिवंगत रत्नाकरजी (तात्या) मखरे यांच्या जन्मदिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त जीवनपट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी :अतुल सोनकांबळे

नेतृत्व आणि वक्तृत्वाचा मिलाफ म्हणजेच तात्या. जाती धर्म बाजूला सारून केवळ माणसाला माणूस म्हणून बघून कार्य करणारे व्यक्ती बोटावर मोजण्याइतके असतात. आजच्या राजकारणात आणि समाजकारणात धर्मांध आणि जातंध्यांची चलती आहे.मात्र शिव, फुले,शाहू, आंबेडकरी विचारांची कास धरून सामाजिक, राजकीय क्षेत्रात प्रभावी वाटचाल करणारे व्यक्ती म्हणजे तात्या. त्यांची विशेष ओळख म्हणजे राजकारणा पलीकडे पाहणारा एक सामाजिक कार्यकर्ता म्हणूनच राहिली. अनेक वर्षापासून नानाविध अध्यायांचा इतिहास,हृदय आणि श्वासांच्या नात्याइतका एकरुपतेने सामावला गेला आहे.

तात्यांची राजकीय जीवनाची सुरुवात खऱ्या अर्थाने सन– १९७४ पासून इंदापूर नगरपालिकेत नगरसेवक निवडीने झाली.१२ डिसेंबर १९९० ला नगरसेवकांमधून नगराध्यक्षपदी तात्यांची निवड झाली. नगराध्यक्ष पदाच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक विधायक योजना राबविल्या. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्ध पुतळे नगरपालिका मैदानात बसविले . रोजंदारीवरील ३८ कामगारांना न्यायालयाच्या माध्यमातून कायम केले. पालिके शेजारी जि. प.शाळेला नवीन खोल्या बांधल्या. उद्योग धंद्यासाठी लोकांना गाळे काढून दिले.न पा. च्या तळ्यात स्विमिंग पुल बांधण्याची तात्यांची इच्छा होती. तसेच आधुनिक पद्धतीचा बगीचा बनविण्याचा संकल्प होता. परंतु ते स्वप्न अपूर्ण राहिले याची खंत तात्यांना नक्कीच राहिली. महाराष्ट्रातील नामांकित कारभार चालवणारे नगराध्यक्ष म्हणून तात्यांना बहुमान मिळाला. तात्यांना त्यांच्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत नगरपालिकेच्या कर्मचारी वर्गानी प्रचंड साथ दिली.हे सांगायला तात्या विसरले नाहीत.

तात्यांनी राजकीय जीवनात भाजपा मध्ये देखील काही काळ काम केले. पण त्यात ते रमले नाहीत.मा. एम. बी. मिसाळ (नाना) यांच्या व कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव भारतीय दलित पँथर मध्ये राजकीय सुरुवात झाली. आक्रमकतेने काम, आंदोलने उभारली. समाजासाठी काहीतरी वेगळं काम करण्याची तात्यांची तयारी असायची वेळप्रसंगी तुरुंगवास भोगावा लागला. राष्ट्रीय नेते रामदासजी आठवले साहेबांशी घनिष्ठ संबंध आले. आठवले साहेबांनी तात्यांना महाराष्ट्रभर फिरवलं. दौरे झाले. घणाघाती भाषणं व्हायची. अन्यायाविरूद्ध लढतांना नवी



ऊर्जा मिळायची . पुढे दलित पँथर जिल्हाध्यक्ष, आरपीआय जिल्हाध्यक्ष अशा एक ना अनेक जबाबदाऱ्या तात्यांनी निडर पणे पार पाडल्या.

तात्यांच्या भाषणाची सुरुवात बहुजन महापुरुषांची नावे घेऊन संथ गतीने होवून नंतर वीजेची दाहकता ओकत असलेल्या शब्दांत भाषण अनेक उदाहरणासह द्यायचे. शब्द व बोलणारे तात्या समजायला लागले.हजारो जीभांनी तात्यांची वेगवेगळी व्याख्या केलेली आहे.मात्र मला जाणवलेले तात्या हे कुटुंबवत्सल होते.हळवे कवी मन व झुंजार कार्यकर्ते या त्यांच्या दोन बाजू होत्या.त्यांनी कधी काही दडवल नाही. खुल्लमखुल्ला मोकळेपणानं आरशासारखं स्पष्ट बोलायचे. खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणणारे स्पष्ट वक्ते, सार्वजनिक क्षेत्रात भरीव कामगिरी करणारे, प्रचंड इच्छाशक्ती, नाविन्याचा ध्यास घेणारे, आपल्या कार्य कर्तृत्वाने आपलेसे करणारे प्रेरणास्थान तात्या. दूरदृष्टीने झपाटून काम करणारं गतिमान नेतृत्व म्हणजे तात्या.. त्यांच्या सोबत काम करताना वेगळीच ऊर्जा मिळायची. तात्यांनी मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट इंदापूर शिक्षण संस्थेला स्वतः च्या मालकीची ५.१/२ एकर जमीन वापरासाठी दिली आहे. त्याठिकाणी शाळेकरिता भव्य दिव्य अशी देखणी इमारत उभी आहे.१ली ते १२ वी पर्यंतचे विद्यार्थी तेथे शिक्षण घेतात. निवासी खोल्या मुला मुलीं साठी स्वतंत्र निवास व्यवस्था आहेत.३६८ विद्यार्थी निवासी आहेत. अनिवासी विद्यार्थी शहरातून शिक्षणासाठी शाळेला येतात. शालेय संकुलाला तात्यांनी स्वतः च्या आई वडिलांचे नाव न देता बहुजन महापुरुष व महामातांची प्रत्येक विभागाला नावे देऊन तात्यांनी नवा आदर्श घालून दिला. त्या संपूर्ण परिसराला जिजाऊनगर हे नाव दिलेले आहे. प्राथमिक, माध्यमिक,उच्च माध्यमिक आश्रमशाळा तसेच मुलांचे व मुलींचे अनुदानित वसतिगृह या माध्यमातून असंख्य विद्यार्थ्यांचे भवितव्य त्यांनी घडवले. या दरम्यानच्या काळात राष्ट्रीय नेते श्री. शरदचंद्र पवार पवार साहेब यांचे अनेक वेळा संस्थेला सहकार्य लाभले. अनुदान वेळेवर न मिळाल्याने अडचणीच्या काळात आदरणीय पवार साहेबांनी खूप मदत केली. दिवंगत लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री असताना तत्कालीन सरकारमुळे आश्रम शाळांना अनुदान देण्यास प्रचंड विलंब केला.दरम्यानच्या काळात इंदापूर तालुक्यात शेटफळगढे धरण उंची वाढविणे संदर्भात उद्धघाटन कार्यक्रम होता. त्यावेळी काटी ता. इंदापूर येथे त्यांची सभा होती. तात्यांनी विद्यार्थ्यांचा मोर्चा त्याठिकाणी नेला होता. मुंडे साहेब आमच्या मोर्चाला सामोरे आले. तात्यांनी अनुदानाची कैफियत मांडली. निवदेन मुंडे साहेबांनी स्वीकारलं. आणि मुंडे साहेब म्हणाले, मुलांच्या खाण्यापिण्याच्या अनुदानाचे पैसे रखडवणे चुकीचे आहे. तुम्ही काळजी करू नका. दोन दिवसात तुमचे अनुदान मिळण्याची मी व्यवस्था करतो. असे तात्यांना मुंडे साहेबांनी आश्वासन दिले. आणि खरोखर दोन दिवसात समाज कल्याण पुणे येथील अधिकारी अनुदानाचा धनादेश इंदापूरला घेऊन आले. अनुदानाचा धनादेश तात्यांकडे सुपूर्द केला. शिक्षणाशी ज्या पिढ्यांचा कधी दुरान्वये संबंध आला नव्हता, अशा पददलित,भटके विमुक्तांच्या, बहुजनांच्या नव्या पिढ्यांना त्यांनी केवळ सुशिक्षित केले नाही.तर बुध्द,कबीर, शिव,फुले, शाहू आंबेडकर या बहुजन महापुरुषांची दृष्टी दिली. सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल महाराष्ट्र शासनाने तात्यांच्या शिक्षण संस्थेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्काराने सन्मानित केले. संस्थेतील कर्मचारी वर्गाने देखील मोलाची साथ दिली त्यांचे सहकार्य लाभले हे सांगायला तात्या विसरले नाहीत. माध्यमिक आश्रमशाळा तात्यांना मिळणे कामी राष्ट्रीय नेते मा.शरदचंद्र पवार साहेब यांच्या सूचनेवरून माजी मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी सहकार्य केले, त्याबद्दल तात्यांनी संस्थेच्या वतीने इंदापूर येथील दूधगंगा येथे माजी मंत्री हर्षवर्धनजी पाटील यांचा येथोचीत सत्कार केला. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे वडील दिवंगत शहाजी बापू पाटील यांचे तैलचित्र आश्रमशाळेत मोठा कार्यक्रम घेऊन माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या उपस्थितीत बसविणारे इंदापूर तालुक्यात एकमेव व्यक्ती तात्या आहेत. थोर स्वातंत्र्य सेनानी शाहीर नागसेन तथा जंगम स्वामी हे क्रांतिसिंह नानापाटील यांच्या कार्यकाळातील थोर सेनानी होते. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्यांचाही खारीचा वाटा आहे. परंतु शाहीर जंगम स्वामी यांचा शासनाच्या वतीने कोणताच सन्मान झाला नाही. ते उपेक्षित राहिले होते. शासनाची कोणतीही आर्थिक मदत मिळाली नाही. तात्यांनी शाहीर जंगम स्वामी यांचा भिमाई आश्रमशाळा इंदापूर येथे १०१ वा. वाढदिवस मोठ्या थाटात साजरा केला. त्यांच्या वृद्धापकाळात त्यांनी त्यांचा सांभाळ केला. त्यांना मदत केली. शासन दरबारी तात्यांनी पाठपुरावा करून शासनाकडून जंगम स्वामी यांना मदत मिळून दिली. तात्या एवढ्यावर न थांबता शाहीर जंगम स्वामी यांच्या कार्याची आठवण राहावी म्हणून मुलींच्या निवासी इमारतीला शाहीर नागसेन तथा जंगम स्वामी असे नावं देऊन एक वेगळा आदर्श ठेवला.

तात्या त्यांच्या मर्जीनुसार जगताना

त्यांच्या जबाबदा–यांपासून ते कधी दूर गेले नाहीत. जनतेचे दुःख जपणारे, सत्यासाठी धडपडणारे, जनतेची वकिली करणारे ध्येयनिष्ठ, कार्यमग्न, बहुआयामी व्यक्तिमत्त्व, कार्यतत्पर, वक्तशीर, संघर्षशील, हसतमुख, कुटुंबवत्सल, संवेदनशील, स्पष्टवक्ते, शिक्षणप्रेमी व धुरंधर असे नेतृत्व म्हणजे तात्या. सामाजिक बांधिलकी जपत कोल्हापूर, सांगली, सातारा येथे महापूर आला होता. तेथील लोकांचे अतोनात नुकसान झाले होते. लोक भयभीत होऊन मदतीसाठी याचना करत होते. तात्यांनी स्वतः व संस्थेतील कर्मचारी यांच्या वतीने १६ ऑगस्ट २०१९ रोजी ७५,०००/– रुपये किंमतीचे जीवन उपयोगी साहित्य पूरग्रस्तांना दिले.

गेल्या चाळीस पंचेचाळीस वर्षात राज्यपातळी,जिल्हा पातळीवर सर्व सामान्य बहुजनांवर झालेल्या कायिक वाचिक हल्लयाच्या विरोधात तात्यांचे देखणे शब्द तलवारी सारखे तळपले. त्यांनी आवाज उठवले म्हणून त्या वृत्तीनी डोके वर काढले नाही., हे तात्यांशी मतभेद असणारे सुध्दा मान्य करतील. तात्यांनी आयुष्यात अनेक चढ उतार पाहिले. प्रतिकूल परिस्थितीत खूप संघर्ष केला. तात्यांना त्यांच्या प्रत्येक प्रसंगात पत्नी शकुंतला मखरे (काकी) यांनी साथ दिली. कुटुंबातील सर्व सदस्यांचा साथ सहयोग असल्यानेच तात्यांना सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात आपलं योगदान देता आलं. काम करता आलं. हे वास्तव आहे. कोरोना ह्या महामारीमुळे लॉकडाऊनच्या बिकट परिस्थिती मध्ये गोरगरीब लोकांच्या हाताला काम नाही म्हणून उपासमारीची वेळ आली होती. तात्यांनी भिमाई आश्रमशाळेवर इंदापूर शहरातील आंबेडकरनगर, साठेनगर, होलारवाडा या भागातील लोकांना गहू,तांदूळ ह्या वस्तूंचे वाटप केले. कोणतीही गोष्ट प्रसिद्धी मिळावी म्हणून कधी केली नाही. गरीबीचे चटके त्यांनी स्वतः सोसले असल्याने गरिबीच्या व्यथा काय असतात हे तात्यांनी जवळून अनुभवलं आहे. म्हणून त्यांनी मदत करताना मागे पुढे पाहिले नाही. तात्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती (ट्रस्ट) इंदापूरच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती सुरु करुन मोठा आदर्श ठेवला. पहिल्या शिवजयंतीला छत्रपती संभाजी महाराज यांना बोलावण्यात आले होते.

अशा किती तरी घटना, प्रसंग आहेत ज्यातून तात्यांचे वेगळेपण, साधेपणा, मोठेपण, कर्तृत्व दिसून येत राहिलं. कोरोना महामारीमुळे राज्याच्या तिजोरीवर ताण आल्याने शासनाने बऱ्याच योजनांवरील अनुदान देणे थांबवले होते. आश्रमशाळाचे अनुदान देखील थांबवले होते. ज्यांनी शाळेला उधारीवर माल दिला ते किराणा दुकानदार पैशासाठी तगादा लावू लागले. तात्यांनी ही सारी कैफियत तत्कालीन राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या कानावर घातली. तत्कालीन अर्थमंत्री अजितदादा पवार यांना ईमेलद्वारे वरील समस्या सांगितल्या. दादांच्या स्वीय सहाय्यकांनी दादांना आलेला ईमेल दाखवला अजितदादा पवार यांनी तात्यांना फोन करून सांगितले की, तात्या तुम्ही काळजी करू नका. तुमचा अनुदानाचा प्रश्न तातडीने मार्गी लावतो. तात्यांच्या नेतृत्वात आम्ही तब्बल ८२ दिवस अनुदानासाठी इंदापूर तहसील कचेरी समोर धरणे धरले.हे आपोआप असच घडत नाही. त्यासाठी मेहनत, कष्ट आणि पाठपुरावा केल्याशिवाय काहीही मिळत नाही असं तात्या नेहमी म्हणायचे . तत्कालीन सरकारने आश्रम शाळेला (मुला – मुलींना) मिळणारा रेशनिंगचा गहू ,तांदूळ बंद केला होता. तात्यांनी राष्ट्रीय नेते शरदचंद्र पवार साहेब यांना ईमेलद्वारे सदरची समस्या लिखित स्वरूपात पाठवली. पवार साहेबांनी स्वतः लक्ष घालून राज्याचे तत्कालीन अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ साहेबांना आदेशित केले. मग तो प्रश्न पवार साहेबांमुळे मार्गी लागला. कोणत्याही हार– तुऱ्याची अपेक्षा तात्यांनी कधीच ठेवली नाही. तात्यांकडून पाठीवर शाबासकीची थाप यापुढे कधीच मिळणार नाही. तात्यांची उणीव नेहमी भासेल.

दिवंगत तात्यांना अमृतमहोत्सवी वर्षा निमित्त विनम्र अभिवादन ! (दि.९/७/२०२५)

**– शब्दांकन : नानासाहेब सानप सर**
**भिमाई प्राथमिक आश्रमशाळा इंदापूर जि.पुणे.**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# राज्यात नागरी भागात तुकडेबंदी कायदा रद्द

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेची विधानसभेत घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणारा कायदा १९४७ नुसार ठराविक प्रमाणात कमी क्षेत्रफळ असलेल्या जमिनींची खरेदी-विक्री कायद्याने प्रतिबंधित होती. या पार्श्वभूमीवर १ जानेवारी २०२५ पर्यंत शहरी भाग, गावठाण पासून २०० मीटर पर्यंत आणि विविध प्राधिकरणांमधील भागात झालेले सर्व तुकड्यांचे व्यवहार मान्य करण्यात येणार आहेत. अशाप्रकारे एक गुंठेपर्यंत जमिन व्यवहारासाठी तुकडेबंदी कायदा रद्द केला जाईल, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेची विधानसभेत केली.



याबाबतची अधिकची माहिती देताना मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी १५ दिवसात आदर्श कार्यप्रणाली तयार करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे सुमारे ५० लाख कुटुंबांना जमीन व्यवहाराचा फायदा होणार आहे. १ जानेवारी २०२५ नंतर अशा व्यवहारांमध्ये प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.

याबाबत सदस्य अमोल खताळ यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेचा चर्चेदरम्यान सदस्य जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, प्रकाश सोळंके, विक्रम पाचपुते, अभिजीत पाटील यांनीही उपप्रश्न विचारत सहभाग घेतला.

मंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, राज्य शासनाने ८ ऑगस्ट २०२३ रोजीच्या अधिसूचनेनुसार, मुंबई शहर, मुंबई उपनगर, अकोला आणि रायगड जिल्हे वगळता राज्यातील इतर ३२ जिल्ह्यांमध्ये स्थानिक क्षेत्र घोषित करून बागायतीसाठी १० आर आणि जिरायतीसाठी २० आर इतके प्रमाणभूत क्षेत्र निश्चित केले आहे. यामध्ये महानगरपालिका व नगरपरिषदा हद्दीतील क्षेत्रांचा समावेश करण्यात आलेला नाही. धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत १९४७ च्या कायद्यातील कलम ७, ८ व ८अ नुसार स्थानिक क्षेत्रामध्ये जमिनीचे तुकडे निर्माण होणार नाहीत, अशा पद्धतीनेच हस्तांतरण करता येते. मात्र, १ जानेवारी २०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार विशेष नियोजन प्राधिकरण किंवा नगरविकास प्राधिकरण अंतर्गत येणाऱ्या, तसेच प्रादेशिक योजनेत अकृषिक वापरासाठी निश्चित केलेल्या जमिनी या कायद्याच्या तुकडेबंदीच्या नियमांपासून वगळण्यात आलेल्या आहेत.

**आदर्श कार्यप्रणाली तयार करण्यात येणार ; ५० लाख कुटुंबांना लाभ**

तुकडेबंदी कायद्यामुळे अनेक व्यवहार प्रलंबित होते. नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. हा कायदा रद्द केल्यामुळे कमी क्षेत्राची खरेदी-विक्री करता येणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी महसूल विभाग व नगरविकास १ चे अपर मुख्य सचिव, जमाबंदी आयुक्त आणि नोंदणी महानिरीक्षक अशा चार अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय समिती गठित केली जाणार आहे. याबाबत लोकप्रतिनिधीच्या सूचना असतील त्यांनी अपर मुख्य सचिव, महसूल यांच्याकडे लेखी स्वरूपात सात दिवसात पाठवाव्यात असेही मंत्री श्री. बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

## पिंपळस रामाचे जि. प. प्राथमिक शाळेत बाल गोपाल विठ्ठल भक्तीत दंग



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी:- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळस रामाचे येथे आषाढी एकादशीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी भव्य दिंडीचे आयोजन करण्यात आले. सर्वधर्म प्रेम,सहिष्णुता आणि शांततेचा संदेश देणाऱ्या या दिंडीने परिसर भक्तीरसात न्हाल्याचे दृश्य पाहायला मिळाले.

देव एकच आहे,त्याची नावे अनेक असू शकतात,पण मानवतेचा हात हाच श्रेष्ठ धर्म आहे, असा संदेश या दिंडीच्या माध्यमातून देण्यात आला. शाळेच्या बालगोपालांनी वारकऱ्यांच्या पारंपरिक वेशभूषेत सजून टाळ, मृदंग, लेझीम पखवाजाच्या गजरात विठ्ठलनामाचा जयघोष करत परिसर पंढरपूरमय केला. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र दुसाने,नवनाथ बटवल,मनोज दलाल,दिनेश पाटील,पोपट मोरे,प्रदीप पालवी उपशिक्षिका,लता जाधव,शीला कसबेकर,माधुरी सोनवणे,पल्लवी भडके,रंजना पैठणकर,जयश्री मोरे,मयुरी पंडित इत्यादी उपस्थित होते शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र दुसाने यांनी विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदाय,संत परंपरा व विठ्ठलभक्ती याविषयी माहिती दिली. क्रीडा शिक्षक विलास गायकवाड यांनी विठ्ठलाच्या तालावर लेझीम पथक पथकाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

शाळेच्या लहानग्या विद्यार्थ्यांनी ज्ञानोबा-तुकाराम, पुंडलिक वरदा हरि विठ्ठल, माऊली माऊली अशा भक्तीगीतांच्या जयघोषात परिसरात भव्य दिंडी काढली.विद्यार्थ्यांच्या निरागस चेहऱ्यावर झळकणारा भक्तीभाव,टाळ-मृदंगाच्या गजरात त्यांनी सादर केलेला उत्साह यामुळे संपूर्ण परिसरात आनंद आणि भक्तीमय वातावरण निर्माण झाले.

दिंडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध संतपरंपरेची ओळख, सामाजिक ऐक्य, प्रेम, सहिष्णुता आणि एकोप्याचा संदेश देण्यात आला.

# पिंपळस रामाचे जि. प. प्राथमिक शाळेत बाल गोपाल विठ्ठल भक्तीत दंग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी:- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळस रामाचे येथे आषाढी एकादशीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी भव्य दिंडीचे आयोजन करण्यात आले. सर्वधर्म प्रेम,सहिष्णुता आणि शांततेचा संदेश देणाऱ्या या दिंडीने परिसर भक्तीरसात न्हाल्याचे दृश्य पाहायला मिळाले.

देव एकच आहे,त्याची नावे अनेक असू शकतात,पण मानवतेचा हात हाच श्रेष्ठ धर्म आहे, असा संदेश या दिंडीच्या माध्यमातून देण्यात आला. शाळेच्या बालगोपालांनी वारकऱ्यांच्या पारंपरिक वेशभूषेत सजून टाळ,मृदंग, लेझीम पखवाजाच्या गजरात विठ्ठलनामाचा जयघोष करत परिसर पंढरपूरमय केला.

या वेळी शाळेचे मुख्याध्यापक शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र दुसाने,नवनाथ बटवल,मनोज दलाल,दिनेश पाटील,पोपट मोरे,प्रदीप पालवी उपशिक्षिका,लता जाधव,शीला कसबेकर,माधुरी सोनवणे,पल्लवी भडके,रंजना पैठणकर,जयश्री मोरे,मयुरी पंडित इत्यादी उपस्थित होते शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र दुसाने यांनी विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदाय,संत परंपरा व विठ्ठलभक्ती याविषयी माहिती दिली. क्रीडा शिक्षक विलास गायकवाड यांनी विठ्ठलाच्या तालावर लेझीम पथक पथकाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले

शाळेच्या लहानग्या विद्यार्थ्यांनी ज्ञानोबा-तुकाराम, पुंडलिक वरदा हरि विठ्ठल, माऊली माऊली अशा भक्तीगीतांच्या जयघोषात परिसरात भव्य दिंडी काढली.विद्यार्थ्यांच्या निरागस चेहऱ्यावर झळकणारा भक्तीभाव,टाळ-मृदंगाच्या गजरात त्यांनी सादर केलेला उत्साह यामुळे संपूर्ण परिसरात आनंद आणि भक्तीमय वातावरण निर्माण झाले.

दिंडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध संतपरंपरेची ओळख, सामाजिक ऐक्य, प्रेम, सहिष्णुता आणि एकोप्याचा संदेश देण्यात आला.

# सुरेश छत्रे यांची विश्वविक्रमी रांगोळी बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसमध्ये नोंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी

अकिवाट तालुका शिरोळ येथील चित्रकार, रंगावलीकार सुरेश मलगोंडा छत्रे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी रायगड (रोहा) येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त शिवरायांच्या प्रतिमेची विश्वविक्रमी रांगोळी रेखाटली. या रांगोळीची लंडनच्या जागतिक 'बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड 'भारत बुक ऑफ रेकॉर्ड,तसेच यु एस ए बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद झाली आहे.




रायगड : येथे काढण्यात आलेल्या विश्वविक्रमी रांगोळीत सहभागी झालेल्यल्या कोल्हापूरच्या सुरेश छत्रे यांचा मान्यवरांच्याहस्ते सन्मान करण्यात आला. १ लाख २५ हजार चौरस फुटाची विश्वविक्रमी रांगोळी साकारून वर्ल्ड रेकॉर्ड केले आहे. याची लंडन बुक ऑफ रेकॉर्डस्, भारत बुक ऑफ रेकॉर्ड,तसेच यु एस ए बुक ऑफ रेकॉर्ड नोंद झाली आहे. ३ ते ७मार्चरोजी रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यामध्ये तीन एकर क्षेत्रात रांगोळी साकारण्यात आली. या उपक्रमासाठी रायगडचे खासदार सुनील तटकरे यांचे विशेष सहकार्य मिळाले. खा. तटकरे यांच्याहस्ते कलाकारांचा सत्कार करण्यात आला. सुरेश छत्रे हे शाळे मध्ये शिकत असतानाच वडिलाचे छत्र हरवले घरची परिस्थिती अगदी बेताची असून सुद्धा त्यांनी यशाला गवसणी घातली आहे .बाहुबली विद्यापीठ संचलित विद्यासागर हायस्कूल अकिवाट येथे चित्रकलेची प्राथमिक धडे अध्यापक रावसाहेब पुदाले यांच्या सहकार्याने गिरवले. त्यानंतर ललित कला महाविद्यालय इचलकरंजी, येथून त्यांचे कला शिक्षण पूर्ण केले.उत्कृष्ट चित्र कला रांगोळी ,शिल्प कलेच्या आणि नावीन्यतेच्या आधारावर त्यांनी राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्तरावरील गोल्ड मेडल, सिल्वर मेडल अशा अनेक पारितोषिके प्राप्त केली आहेत.

# १२ जुलै रोजी एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट, पुणेतर्फे 'यूपीएससी-२०२४ यशस्वितांचा १५वा राष्ट्रीय पातळीवरील सत्कार सोहळा

पुणे/प्रतिनिधी : एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट (मिटसॉग) आणि डिपार्टमेंट ऑफ इकॉनॉमिक्स अँड पब्लिक पॉलिसी यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) स्पर्धा परीक्षा-२०२४ मधील यशस्वितांच्या १५ व्या राष्ट्रीय सत्कार सोहळ्याचे आयोजन शनिवार, १२ जुलै रोजी स.९.३० वा. कोथरूड येथील एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्वामी विवेकानंद सभागृहात आयोजन करण्यात आले आहे.

देशातून प्रथम आलेली शक्ती दुबे आणि तिसरा आलेला अर्चित डोंगरे यांच्यासह इतर यशस्वितांना गौरविण्यात येणार आहे. यूपीएससी मध्ये भारतातून प्रथम येणाऱ्यास शाल, ज्ञानेश्वरांची प्रतिमा व सन्मानपत्र व १ लाख रूपये रोख देण्यात येणार आहेत. तसेच तृतीय क्रमांकास-३० हजार रूपये रोख देण्यात येतील. यावेळी १३० ते १४० हून अधिक यशस्वीतांचा सत्कार करण्यात येणार आहे.

या समारंभासाठी लोकसभेच्या पहिल्या महिला महासचिव स्नेहलता श्रीवास्तव, मुंबई येथील माजी पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर आणि सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलिस अकादमीचे माजी संचालक ए.एस.राजन हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील.

यावेळी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष प्रा. राहुल विश्वनाथ कराड यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

तसेच, ११ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेल्या सर्वीस ओरिएंटेशन प्रोग्रॅम एमआयटी डब्ल्यूपीयूच्या द्रोणाचार्य इमारतमध्ये होणार आहे. यावेळी मुंबई येथील माजी पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर, सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलिस अकादमीचे माजी संचालक ए.एस.राजन, छत्रपती संभाजीनगर येथील राज्य टॅक्स विभागाचे सह आयुक्त अभिजित राऊत, पटकथालेखक संचालक आदित्य भसीन, बीएमसीचे अतिरिक्त मनपा आयुक्त अभिजीत बांगर आणि आय-टेकचे मुख्य कार्यकारी व व्यवस्थापकीय संचालक अशिम पाटील आणि १३० ते १४० हून अधिक यूपीएससी-सीएसई २०२४ पात्रता उपस्थित राहणार आहेत. त्याच प्रमाणे शक्ती दुबे व अर्चित डोंगरे यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे.

यूपीएससी स्पर्धा परीक्षांची तयारी करीत असलेल्या विद्यार्थ्यांना या टॉपर्सशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या एमआयटीद्वारे आयोजित अशा या आगळ्यावेगळ्या सोहळ्याचे यंदा १५वें वर्ष आहे.

सकाळी ११.३० वा. एमआयटी डब्ल्यूपीयू कॅम्पस, कोथरूड, पुणे येथे होणार असून या ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी सर्व टॉपर्सचा परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे.

प्रशासनामध्ये काम करीत असताना अनेक प्रलोभने सामोरी येतात, त्यांना बळी न पडता देशापुढे चांगल्या कारभाराचा आदर्श कसा ठेवावा, चांगले प्रशासन कसे असते, हे या स्नातकांना समजावे; त्यासाठी या क्षेत्रात प्रदीर्घ अनुभव घेतलेल्या प्रशासकीय अधिकार्यांचा आदर्श त्यांच्यासमोर ठेवावा आणि त्यांच्यावर जनहिताचे चांगले संस्कार व्हावेत, हा या कार्यक्रमाच्या पाठीमागचा हेतू आहे. महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पंजाब, चंडीगड, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तमिळनाडू, केरळ, ओरिसा, बिहार, पश्चिम बंगाल, आसाम, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, दिल्ली, छत्तीसगड, हरियाना, सिक्कीम, नागालँड आदी भारताच्या सर्व राज्यातील आयएएस, आयपीएस, आयआरएस व इतर केंद्रीय सेवेमधील यशस्वी झालेल्या १३० ते १४० विद्यार्थ्यांनी या समारंभास हजर राहण्यास संमती दिली आहे.

या सेवेत प्रवेश करणारे हे विद्यार्थी भारताच्या प्रशासकीय सेवेचा महत्वाचे अधिकारी म्हणून भाग होणार आहेत. प्रशासकीय सेवा, विधिमंडळाने पारित केलेले कायदे हे योजना आणि धोरणांच्या अंमलबजावणीमध्ये महत्वाची भूमिका बजावत असते. अशा विद्यार्थ्यांचे कौतुक करावे आणि त्यांचा सत्कार करावा, त्यांच्या भावी कार्यास शुभेच्छा द्यावी, या हेतूने त्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

भारतातील, तसेच, महाराष्ट्रातील यूपीएससी-एपीएससी परिक्षार्थींना या यशस्वितांचे मार्गदर्शन मिळावे, तसेच, त्यांच्याशी सुसंवाद साधता यावा ही या कार्यक्रमाच्या आयोजनामागील प्रेरणा आहे. या मार्गदर्शनातून प्रेरणा घेऊन अनेक विद्यार्थी या स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी व्हावेत हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू आहे.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी ही आध्यात्मिक व सामाजिक स्तरावर काम करीत आहे. त्याचप्रमाणे एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट ही राजकीय नेतृत्वाचे प्रशिक्षण देणारी भारतातीलच नव्हे, तर आशिया खंडातील एकमेव अशी संस्था चालविली जात आहे. सामाजिक बांधिलकीचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून यूपीएससीमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा राष्ट्रीय पातळीवर सत्कार करण्याचा संस्थेचा मानस आहे.

अशी माहिती एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस, स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड कॉमर्सच्या डीन डॉ. अंजली साने आणि मीटसॉगच्या जर्नल व रिर्सचचे प्रमुख डॉ. परिमल माया सुधाकर यांनी दिली आहे.

**प्रश्न विठ्ठल भक्तांना, पंढरपूरच्या वारीत गिरीश महाजन यांचं निस्सीम समर्पण**

**चर्चा मंत्री गिरीश महाजन यांच्या त्या १७ तासांच्या कामगिरीची !**

# मंत्री गिरीश महाजन यांच्या विठ्ठल सेवेने भारावला राज्यातील वारकरी, मंत्री की सेवेकरी?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आषाढी वारीच्या निमित्ताने पंढरपूर नगरी भक्तीमय वातावरणाने भारलेली असतानाच, यंदा लाखो वारकऱ्यांच्या श्रद्धेला नव्या भक्तिप्रेरणेची जोड मिळाली - ती म्हणजे मंत्री रूपी सेवेकरी गिरीश महाजन यांचं प्रेरणादायी रूप ! मंत्री गिरीश महाजन यांच्या याच प्रेरणादायी विठ्ठल सेवेने राज्यातील वारकरी भरावला असून आता सर्वत्र चर्चा होत आहे, ती मंत्री गिरीश महाजन यांच्या त्या १७ तासाच्या कामगिरीची !

राज्याचे जलसंपदा मंत्री आणि आपत्ती व्यवस्थापनाचे संकटमोचक म्हणून ओळखले जाणारे गिरीश महाजन यांनी यंदाच्या वारीत एक वेगळाच इतिहास घडवला. त्यांनी ५ जुलैच्या मध्यरात्रीपासून ते ६ जुलै सायंकाळपर्यंत तब्बल १७ तास अखंड, न थकता, न थांबता सेवा दिली. कुठलाही राजकीय आव न आणता, साध्या पोशाखात, हातात वॉकी-टॉकी आणि मुखात 'पांडुरंग हरी जय जय पांडुरंग हरी' हे नामस्मरण करत ते वारकऱ्यांच्या सेवेत रमले होते.

सेवेची साक्षात उपासना, वारीच्या दिवशी रविवारी पंढरपूरच्या महाद्वार परिसरात भाविकांची प्रचंड गर्दी होती. लाखोंच्या संख्येने वारकरी दाखल झाले होते, या गर्दीचे नियंत्रण, मार्गदर्शन आणि समन्वय साधण्यासाठी गिरीश महाजन स्वतः पहाटे ५.३० वाजता टॉवरवर चढले आणि सायंकाळी ५ पर्यंत तेथूनच सतत सेवा करत राहिले. स्वतः पोलिस, अधिकारी व आपत्कालीन यंत्रणांशी संवाद साधत होते,सूचना करीत होते . काही वेळा ते थेट मैदानात उतरून दिशाभूल झालेल्या वारकऱ्यांना मार्गदर्शन करताना दिसले. हे दृश्य पाहून अनेक वारकरी थक्क झाले. कोणी म्हणाले, हा सेवेकरी खरेच मंत्री आहे का ? तर अनेकांनी त्यांच्या हातात जेवन आणि पाण्याच्या बाटल्या देत कृतज्ञतेचा भाव व्यक्त केला.

> मंत्री गिरीश महाजन साहेब हे वारकऱ्यांना करीत असलेले मार्गदर्शन व त्यांच्यातील विठ्ठल भक्ती मुळे वारकऱ्यांचे श्री. विठ्ठलाचे दर्शन सुखकर झाले, त्यांनी केलेली ही मदत आम्ही सर्व वारकऱ्यांसाठी निश्चितच मोलाची ठरले आहे. गिरीश महाजन यांचे हे रूप पाहून ते मंत्री आहेत असे आम्हाला जाणवलेच नाही, आमच्यातीलच वारकरी म्हणून आम्ही त्यांना पाहत होतो, त्यांच्या या सेवेकरी रूपाने आम्ही वारकरी भारावलो आहोत.
>
> **– सुबोध ताटे (दहिवली ता.माढा जिल्हा सोलापूर)**

सेवेचा संदेश, व्यवस्थापनाचे यश , मंत्री महाजन हे जरी आपत्ती व्यवस्थापन विभागाचे मंत्री असले तरी, त्यांनी आपत्तीच्या काळातली तत्परता इथेही सेवाभावाने दाखवून दिली. तेथील पोलीस अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवक यांनाही महाजन यांचा उत्साह प्रेरणा देत होता. वारकरी भक्तांसाठी ही केवळ सेवा नव्हे, तर त्यांच्या श्रद्धेला प्रशासनाकडून मिळालेली सच्ची मान्यता होती. वारीतून मिळालेला खरा मंत्र ,गिरीश महाजन यांचे हे सेवाभावाचे रूप हे फक्त एक कर्तव्य नव्हे, तर नेतृत्वाची सच्ची व्याख्या आहे. आजच्या काळात राजकारण आणि सेवा या दोन संकल्पनांमध्ये मोठे अंतर दिसते, मात्र महाजनांनी त्या दोघांमध्ये पूल बांधला. वारकऱ्यांसाठी ही केवळ एक अनुभूती नव्हे तर एक संदेश आहे - सेवा हीच खरी भक्ती आणि व्यवस्थापन हीच खरी उर्जा!



> **सलग दोन दिवस लाखो वारकऱ्यांच्या सेवेत राहून विठुरायाची भक्ती करण्याचे सौभाग्य मला लाभले. मी धन्य झालो. या अविरत सेवेने वेगळी सकारात्मक ऊर्जाही निर्माण झाली, वारक-यांच्या रूपाने मला श्री. पांडुरंगाचे दर्शन झाले : –**
>
> **– गिरीश महाजन (जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन विभाग मंत्री)**

मंत्री गिरीश महाजन यांच्या या विठ्ठल भक्तीने अनेक वारकरी यांना कुतुहल वाटत होते. रविवारी दिनांक ६ रोजी आषाढी एकादशी असल्याने मंत्री गिरीश महाजन हे तीन दिवस अगोदर म्हणजेच शुक्रवार पासूनच पंढरपुरात दाखल झाले होते. त्यांनी विविध यंत्रणांचा आढावा घेतला प्रत्यक्ष पाहणी केली. शासकीय यंत्रणांचे नियोजन तपासले, वारीत होणारा गर्दीचा उच्चांक लक्षात घेता सर्वांना सूचना दिल्यात. मुख्यमंत्र्यांसह अनेक मंत्रीगण देखील दाखल झाले होते. गिरीश महाजन यांनी वारकऱ्यांची सेवा करून आपले विठ्ठल प्रेम वारकऱ्यांच्या मनात निर्माण केले आहे. गेल्या वर्षी मंत्री गिरीश महाजन यांनी वारकऱ्यांची विविध पातळीवर सेवा केली. अनेकांना तर मंत्री गिरीश महाजन यांचे हे सेवाभावाचे रूप पाहून त्यांना संकटमोचक का ? म्हणतात याचे जणू कोडे उलगडले आहे. विधानसभेचे पावसाळी अधिवेशन चालू असून आपल्या व्यस्त कार्यक्रमात वारकऱ्यांमध्ये मिसळून केलेली ही विठ्ठलसेवा विधानभवनात देखील सर्व आमदार , मंत्र्यांमध्ये चर्चेचा विषय बनली आहे.

# आषाढी वारीत पंढरपूर शहर स्वच्छ ठेवण्याचे सर्व श्रेय सफाई कामगारांना : जिल्हाधिकारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/पंढरपूर : आषाढी शुद्ध एकादशी निमित्त शासकीय महापूजा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाली. दिनांक २६ जून ते १० जुलै हा आषाढी यात्रा कालावधी असून या कालावधीत पंढरपूर शहर व परिसरात येणाऱ्या लाख खूप भाविकांसाठी शासनाने विविध सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. परंतु पंढरपूर शहर व परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सफाई कामगारांची भूमिका खूप महत्त्वाची होती. त्यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंढरपूर शहरातील गुजराती कॉलनी मध्ये राहणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या घरी जाऊन यात्रा कालावधीत खूप मोठ्या प्रमाणावर स्वच्छता करून संपूर्ण शहर व परिसर स्वच्छ ठेवल्याबद्दल त्यांनी त्यांचे कौतुक करून अभिनंदन केले.

यावर्षीचे आषाढी वारी विविध दृष्टिकोनातून खूप यशस्वी झाली. यात स्वच्छतेला ही खूप मोठ्या प्रमाणावर प्राधान्य देण्यात आलेले होते. या वारीसाठी पंढरपूर शहरात वीस लाखा-पेक्षा अधिक भाविक आलेले होते या सर्व भाविकांना विविध सुविधा देताना शहर स्वच्छ राहणार नाही यासाठी प्रशासनाने विविध भागात मोठ्या प्रमाणावर सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली होती व त्यांच्यावर नियंत्रण असलेल्या सुपरवायझर यांच्यामार्फत सर्व ठिकाणी वेळोवेळी मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहीम राबवून संपूर्ण शहर स्वच्छ ठेवण्यात आले. यात सर्व सफाई कर्मचाऱ्यांनी अत्यंत परिश्रम घेऊन पंढरपूर शहर व परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यात



**जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या घरी जाऊन पंढरपूर शहर स्वच्छ ठेवल्याबद्दल कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले, त्यांच्याशी संवाद साधत चहापाणी व नास्ता ही त्यांच्याकडे घेतला.**

महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. येथील स्वच्छतेबाबत मुख्यमंत्री, पालकमंत्री तसेच वारकरी, भाविक यांनी भरभरून कौतुक केले. स्वच्छतेमुळे येथे येणारे वारकरी भाविक खूप समाधानी होते. ज्या सफाई कर्मचाऱ्यांनी एवढ्या मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहीम वेळोवेळी राबवून शहर स्वच्छ ठेवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली अशा सर्व सफाई कर्मचाऱ्यांना धन्यवाद देण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे पंढरपूर शहरात असलेल्या गुजराती कॉलनीत जाऊन तेथील सर्व सफाई कर्मचाऱ्यांशी त्यांनी संवाद साधला व त्यांनी स्वच्छता मोहिमेत घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांचे कौतुक करून अभिनंदन केले.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी येथील सफाई कर्मचाऱ्यांच्या घरी त्यांच्या समवेत चहा पाणी व नाश्ताही घेतला. यावेळी त्यांच्या समवेत पंढरपूरचे उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे व अन्य अधिकारी तसेच सफाई कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

# प्रथम वर्ष इंजिनिअरिंग प्रवेशासाठी ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशनला मुदतवाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




प्रतिनिधी/पंढरपूरः 'प्रथम वर्ष इंजिनिअरिंग (पदवी) च्या प्रवेशासाठी ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रिया शनिवार, दि.२८ जून २०२५ पासून सुरु झाली असून राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला स्क्रुटीनिटी सेंटर (एस.सी. ६२२०) म्हणून मान्यताही मिळालेली आहे. ही रजिस्ट्रेशन प्रक्रिया मंगळवार, दि. ८ जुलै २०२५ (सायं. ५.००) पर्यंत होती परंतु या कालावधीत अनेक विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी प्रमाणपत्रे मिळाली नाहीत त्यामुळे अनेक विद्यार्थी हे नोंदणी प्रक्रियेपासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शासनाकडून तीन दिवसांची मुदतवाढ दिली आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी दिली.

महाराष्ट्र शासनाच्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर प्रवेश प्रक्रियेबाबत सुधारित माहिती देण्यात आलेली आहे. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या नियोजनात्मक मार्गदर्शनाखाली व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये ऑनलाईन रजिस्ट्रेशनची सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. या प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे, मूळ कागदपत्रे अपलोड करणे आदी बाबींचा समावेश आहे. पदवी अभियांत्रिकीच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठीच्या सुधारित वेळापत्रकानुसार शनिवार, दि.२८ जून २०२५ पासून ते शुक्रवार, दि. ११ जुलै २०२५ (सायं. ५.००) पर्यंत ही प्रक्रिया चालेल तसेच कागदपत्रांची ऑनलाईन पडताळणी व निश्चिती (ई-स्क्रुटीनी) करण्यासाठी सोमवार, दि.३० जुन २०२५ पासून ते शनिवार, दि. १२ जुलै २०२५ (सायं.५.००) पर्यंत मुदत दिली आहे. रजिस्ट्रेशनसाठी विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवर्गानुसार असलेली सर्व मूळ कागदपत्रे घेऊन यावीत तसेच स्वतःचा मोबाइल/नंबर सोबत असावा. 'सदरची नोंदणी यशस्वीपणे आणि बिनचूकपणे केलेले विद्यार्थीच शासनाच्या कॅप राऊंडसाठी पात्र राहतील. सदर कॅप राऊंड मधून प्रवेशित विद्यार्थीच शासनाच्या वेगवेगळ्या सवलती घेण्यास पात्र राहतील. त्यामुळे ही प्रवेश नोंदणी प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असून सर्व विद्यार्थी व पालकांनी स्वेरीत येऊन ही प्रक्रिया येथील तज्ञ शिक्षकांमार्फत पूर्ण करून घ्यावी.' असे आवाहन प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता डॉ. करण पाटील यांनी केले आहे. अभियांत्रिकीच्या प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी अधिष्ठाता डॉ. करण पाटील (९५९५९२११५४) व प्रा. यु.एल. अनुसे (९१६८६५५३६५) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# इंदापूरात रत्नाकर मखरे यांच्या जयंतीनिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी:अतुल सोनकांबळे : दि.९ जनसामान्याच्या हितासाठी त्यांच्या सुदृढ आरोग्यासाठी व रोगाचे योग्य निदान करण्यासाठी इंदापूर येथे माजी नगराध्यक्ष दिवंगत रत्नाकर (तात्या) मखरे यांच्या जन्मदिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त बुधवारी (दि.९)डॉ. आंबेडकरनगर येथील सभागृहात इंदापूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट इंदापूर व क्रिटीकेर सेंटर इंदापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन अकलूज येथील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. एम.के. इनामदार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिबिराच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून इंदापूरचे प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. सागर दोशी हे होते. यावेळी उपस्थित डॉक्टरांचा यथोचित सत्कार आयोजकांच्या वतीने करण्यात आला.

यावेळी डॉ.संजय शहा,डॉ. उदय कुरुडकर, डॉ.मिलिंद खाडे, डॉ.कल्पना खाडे, डॉ. ऋषिकेश गार्डे,डॉ.विनोद राजपुरे आदी तज्ञ डॉक्टरांनी रुग्णांच्या इसीजी, रक्तातील साखर,बीपी, हाडांची तपासणी, स्त्रीयांची तपासणी आदी तपासण्या करून मोफत आरोग्य तपासणी शिबिर पार पडले. यावेळी स्त्रियांच्या तपासणीसाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात आला होता.

यावेळी कार्यक्रमाचे आयोजक व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस व प्रवक्ते ड. राहुल मखरे यांनी प्रास्तविक केले. उपस्थित डॉक्टरांनी वैद्यकीय सल्ला दिला.

डॉ. एम. के. इनामदार यांनी मौलिक मार्गदर्शन करत दिवंगत रत्नाकर (तात्या) मखरेंच्या आठवणीना उजाळा दिला.

तसेच दौंडचे आरोग्य विमा सल्लागार प्रभव काळे यांनी आरोग्य विम्याची गरज व त्याचे फायदे या संदर्भात मार्गदर्शन केले.




**शिबिरास रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद २०० रुग्णाच्या तपासण्या पूर्ण**

यावेळी बारामतीचे माजी नगराध्यक्ष कैलास चव्हाण, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विभागीय अधिकारी आनंद थोरात, गौतम कांबळे, तानाजी धोत्रे, बाबजी भोंग, माजी नगरसेविका व मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्टच्या अध्यक्षा शकुंतला मखरे (काकी) , नगरसेविका राजश्री मखरे, अशा चव्हाण, संतोष मखरे,संजय कांबळे, सुरज धाईंजे, ड.सुरज मखरे, ड. समीर मखरे,गोरख तिकोटे, राहुल शिंगाडे, महेश लोंढे, गणेश चंदनशिवे, अजय पारसे, मयूर मखरे, दया मखरे,रणजीत चंदनशिवे ,सतीश आढाव, अनिल खराडे, सुनील कांबळे, अण्णा गायकवाड, पत्रकार महेश स्वामी, शैलेश काटे, सिद्धार्थ मखरे, सागर शिंदे,शिवाजी शिंदे आदी उपस्थित होते. या शिबीराच्या यशस्वीतेसाठी अल्पवतीतच नावारुपाला आलेल्या इंदापूर क्रिटीकेर सेंटरचे संचालक गोरख भोसले, शिक्षण संस्थेतील कर्मचारी, पक्षाचे कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन नानासाहेब सानप यांनी केले.

# समृद्ध वाचन संस्कृतीचे द्योतक श्री माणकेश्वर वाचनालय : रंधवे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : आजच्या आधुनिकतेच्या काळात वाचन संस्कृती जोपासणे,टिकणे, आणि रुजणे गरजेचे असून निफाडची पिढ्यान-पिढ्या वाचन संस्कृती जोपासून समृद्ध वारसा निर्माण करणारे निफाडचे श्री माणकेश्वर वाचनालय वाचन संस्कृतीचे द्योतक असल्याचे प्रतिपादन युवासेनेचे जिल्हाप्रमुख विक्रम रंधवे यांनी केले ते श्री माणकेश्वर वाचनालयाच्या १०६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. यावेळी विक्रम रंधवे यांनी दिलेल्या दहा वृक्षांचे वाचनालयाच्या आवारात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी वाचनालयाचे संस्थापक विष्णुपंत सोनवणी,भाऊसाहेब उगावकर,चिंतामणराव गाडगीळ यांच्या प्रतिमांचे पूजन युवासेना जिल्हाप्रमुख विक्रम रंधवे, शिवज्ञानदर्शन शिक्षण प्रतिष्ठानचे अध्यक्ष रोशन लोखंडे यांच्या हस्ते करण्यात आले.




यावेळी श्री माणकेश्वर वाचनालयाच्या माध्यमातून निफाडची वाचन चळवळ ही अधिक वृद्धिंगत व समृद्ध होत असल्याचे मनोगतातून रोशन लोखंडे यांनी व्यक्त केले.

यावेळी नाशिक जिल्हा सचिव संघटनेच्या सरचिटणीस पदी राजेंद्र गोसावी, महसूल सहाय्यक पदी सुमित भोई, ह.भ.प.राजेंद्र थोरात महाराज, एस. एम. सोनवणे आदींचा सत्कार करण्यात आला.

यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार,उपाध्यक्ष डॉ. मेघा जंगम,सहचिटणीस राहुल दवते, हिशोब तपासणीस दत्ताकाका उगावकर, संचालक तनवीर राजे, सुहास सुरळीकर, डॉ.महेश बनकर, राजेंद्र खालकर, बाळासाहेब कर्डिले, सुनील चिखले, संचालिका सुजाता तनपुरे सभासद अशोक पगारे, प्रवीण तनपुरे, किरण कोल्हे, संजय घुमरे, सुभाष कुंदे, ऍड.प्रमोद आहेर, रघुनाथ कुंदे, विश्वासराव नवले, शिवराम सेंद्रे, अतुल बर्वे आदींसह ग्रंथपाल नितीन बनसोडे, सहायक ग्रंथपाल आरती जंगम, अनिता इस्ते, नंदकुमार पुंड आदी उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्तविक मधुकरराव शेलार, सूत्रसंचालन सुहास सुरळीकर तर आभार डॉ. महेश बनकर यांनी मानले.

# आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते साप्ताहिक दिव्य गर्जना आषाढी एकादशी विशेष अंकाचे प्रकाशन





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारताची दक्षिण काशी समजल्या जाणाऱ्या श्री विठ्ठलाच्या पंढरी नगरी आषाढी यात्रेच्या निमित्ताने आषाढी एकादशीचे औचित्य साधून साप्ताहिक दिव्य गर्जना आषाढी यात्रा काढण्यात आला होता त्या अंकाचे प्रकाशन माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार व श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सन्माननीय श्री अभिजित (आंबा) पाटील यांच्या शुभहस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी विठ्ठल साखर कारखान्याचे संचालक दिनकर (दाजी) चव्हाण उपस्थित होते.

जेव्हा नव्हतं चरिचर तेव्हा होते पंढरपूर या ओवी प्रमाणे श्री विठ्ठलाच्या पंढरी नगरी मध्ये श्री विठ्ठलाच्या दर्शनाला येणाऱ्या लोखो भाविक भक्तांचे स्वागत करण्यात येणारा आषाढी यात्रेच्या विशेष अंकाचे प्रकाशन झाले या आषाढी एकादशी यात्रा विशेष अंकामध्ये आषाढी एकादशी चे महत्व सांगणारे सांप्रदायिक लेख कविता अभंग वाचणीयय आसा अंक असल्याचे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई प्रश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष व साप्ताहिक दिव्य गर्जनाचे संपादक राजेंद्र कोरके - पाटील यांनी सांगितले. यावेळी पत्रकार ह. भ .प . राधेश बादले पाटीलनितीन लांडे कुमार कोरे सतोष गायकवाड रवी कोळी शंकर कदम वैभव सरडे संतोष मोरे नितीन खाडे अतुल मोरे रोहन नरसाळे संजय यादव आदी जन उपस्थित होते.

**बलिदान देऊन जर न्याय मिळत असेल तर मी त्याही प्रक्रियेला समोर जाणार - श्रीमती स्वाती नागरे**

# स्व.कैलास नागरे यांचा पत्नीचा निवेदनाव्दारे प्रशासनाला १२ दिवसाचा अल्टिमेटम,अन्यथा अन्नत्याग आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन युवा शेतकरी पुरस्कार प्राप्त शेतकरी स्वर्गीय कैलास अर्जुन नागरे रा.शिवणी आरमाळ यांनी शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळावे म्हणून दिनांक १३ मार्च २०२५ रोजी बलिदान दिले आज त्याला चार महिने पूर्ण झाली तरी त्यांच्या कुटुंबाला न्याय नाही त्यांच्या सुसाईड नोटमध्ये केलेला उल्लेख की माझ्या मुलांचं व कुटुंबाचे पालकत्व मुख्यमंत्र्यांनी व उपमुख्यमंत्र्यांनी स्वीकारावे आणि ते मुख्यमंत्री साहेबांनी विधानसभेमध्ये स्वीकारल्याची घोषणा केली,पण त्याचं पुढे काय झालं ते अद्याप काहीच आम्हाला कळालं नाही म्हणून आज उपविभागीय कार्यालय सिंदखेड राजा तहसील कार्यालय देऊळगाव राजा येथे निवेदन देऊन अन्नत्याग आमरण उपोषण करणार असल्याची घोषणाच केली,

निवेदनाद्वारे विनंती केली मला १२ दिवसाच्या आत आपल्या स्तरावर माननीय मुख्यमंत्री साहेबांची भेटीची वेळ शासकीय प्रशासकीय यंत्रणेनुसार मिळावी कारण माननीय मुख्यमंत्री साहेबांनी माझ्या कुटुंबांचे पालकत्व स्वीकारले आहे त्याचे पुढे काय झाले अद्याप काहीच माहिती मला मिळाली नाही यासाठी म्हणजे सगळ्या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात येईल आणि मला व माझ्या मुलांना न्याय मिळेल याकरिता मी आपल्याकडे निवेदनाद्वारे ही वेळ मागत आहे ज्यावेळेस स्वर्गीय कैलास नागरे यांच्या अंत्यविधीसाठी व रक्षाविसर्जनासाठी सर्वच राजकीय पक्षातील

पालकमंत्री साहेब व तसेच विविध सामाजिक राजकीय संघटनेने सर्व शेतकरी संघटना यांनी भेट दिली आणि अनेक राजकीय क्षेत्रातील संघटनेने मुलांच्या शिक्षणाची ,आरोग्याची सगळी जबाबदारी उचलली पण ती सत्यात उतरली नाही म्हणून खंत व्यक्ती केली, तसेच शासकीय प्रशासनाने सुद्धा सर्वांनी येऊन मला भेट दिली सर्वांनी आश्वासन दिले पण आश्वासन पूर्ण झालेच नाही माझ्या पतीचे जे बलिदान झाले ती केवळ फक्त प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे झाले प्रशासनाने त्यांच्या निवेदनाची व आंदोलनाची दखल जर घेतली असती तर ही वेळ माझ्यावर माझ्या मुलांवर आली नसती आज मला न्याय मागण्यासाठी जर मला सुद्धा अन्नत्याग आमरण उपोषण करण्याची वेळ येत असेल तर युवा शेतकरी पुरस्कार स्वर्गीय कैलास नागरे यांच्या पत्नी म्हणून मी तेही सुद्धा आंदोलन करायला तयार आहे परत राज्य सरकारला बलिदान घ्यायचे का? जर बलिदान घेऊन न्याय मिळत असेल तर त्याही सुद्धा प्रक्रियेला मी समोरे जावा असं सरकारला जर वाटत असेल तर ?याची सर्व जबाबदारी ही राज्य सरकारची असेल म्हणून अजून वेळ गेली नाही म्हणून सध्या अधिवेशन चालू आहे आणि अधिवेशनामध्ये माझ्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी




व पालकत्वाची जबाबदारी ही राज्य सरकारने अधिवेशनात मांडावी आणि मला न्याय द्यावा, नाहीतर या सर्व विषयावर चर्चा करण्यासाठी आपण मला १२ दिवसाच्या आत वेळ द्यावा हीच राज्य सरकारकडे युवा शेतकरी पुरस्कार कैलास नागरे यांची पत्नी म्हणून मी या राज्य सरकारकडे हात जोडून विनंती करीते असल्याचे निवेदनामध्ये उल्लेख आहे. मला व माझ्या मुलांच्या भविष्यासाठी तरी वेळ द्या नाहीतर मी माझ्या राहत्या घरी शिवणी आरमाळ येथे श्रीमती स्वाती नागरे माझ्या पतीच्या प्रतिमे जवळ अन्नत्याग आमरण उपोषण दिनांक २१ जुलै २०२५ पासून करणार आहे.माझ्या व माझ्या कुटुंबाच्या आरोग्याची सर्व जबाबदारी ही प्रशासनाची असेल जर बलिदान देऊन न्याय मिळत असेल तर तेही सुद्धा मी करायला तयार आहे कारण उदाहरण, माझ्या पतीने बलिदान दिल्यानंतर शिवनी आरमाळ येथील धरणावरील सर्व झाडं झुडपे काढण्यात आले तेही बलिदान दिल्यानंतरच काढण्यात आली म्हणून राज्य सरकारने माझ्यावर ती वेळ येणार नाही याची खबरदारी घ्यावी असे आव्हान श्रीमती स्वाती नागरे यांनी केली आहे.